# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक: 04.04.2024** **वार: गुरुवार**

---

**टपाल विभाग**

टपाल जीवन विम्याचा लाभ आता सर्व शाखांचे पदवीधर, पदविकाधारकांना घेता येईल अशी माहिती टपाल खात्याच्या पुणे ग्रामीण विभागाचे अधिक्षक बी.पी.एरंडे यांनी दिली. आत्तापर्यंत या योजना फक्त सरकारी, निमसरकारी आणि व्यवसायिक यांच्यासाठीच खुल्या होत्या. टपाल जीवन विमा अंतर्गत, संतोष, सुरक्षा, सुविधा, सुमंगल, युगल सुरक्षा, बाल जीवन विमा आदी विमा योजना उपलब्ध आहेत.

**कर आकारणी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागानं गेल्यावर्षीप्रमाणेच 2024-25 या आर्थिक वर्षात महिला आर्थिक विकास महामंडळाच्या बचत गटातील महिलांमार्फत मालमत्ता कराची बिलं वाटपासाठी सिध्दी हा प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्यावर्षी हा प्रकल्प यशस्वी झाल्यामुळंच पहिल्या तीन महिन्यात 50 टक्के मालमत्ता कर वसूल झाला होता. तसच या उपक्रमामुळे बचत गटातील महिलांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

**स्मार्ट पीएचसी**

पुणे विभागातील आणखी ७२ प्राथमिक आरोग्य केंद्र अर्थात पीएचसीचं स्मार्ट पीएचसी मध्ये रुपांतर केलं जाणार असून त्यानंतर संपूर्ण राज्यात हा प्रकल्प राबवला जाणार आहे . गेल्या वर्षी सातारा जिल्ह्यातून या पथदर्शी प्रकल्पाला सुरुवात करण्यात आली, मात्र पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील केवळ १७ केंद्रं त्यासाठी निवडण्यात आली होती . राज्याच्या ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आणि तिथल्या नागरिकांना शहरांप्रमाणेच आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यादृष्टीनं केल्या जात असलेल्या नियोजनाचा हा एक भाग आहे . कोरोना पश्चात काळात या मोहिमेला अधिक वेग आला आहे.

**आरोग्य गणेशा रुग्णसेवा अभियान**

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे 'आरोग्य गणेशा' हे रुग्णसेवा अभियान राबवलं जात असून त्यांतर्गत आत्तापर्यंत जवळपास ४२ हजार रुग्णांना मदत करण्यात आली असल्याची माहिती ट्रस्टतर्फे देण्यात आली आहे. २०२३-२४ या वर्षात शस्त्रक्रिया, तपासण्या, श्रवणयंत्र आणि चष्मे वाटप, तसचं कृत्रिम अवयव वाटप या रुग्णसेवा मोफत देण्यात आल्या आहेत. यामध्ये पुण्यातील १८५ रुग्णालयांचा सक्रीय सहभाग होता.

**ससून निवेदन-भूषण-पूजा**

पुण्यातील ससून रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात उंदीर चावल्यानं एका रुग्णाचा मृत्यू झाल्याचा आरोप रुग्णाच्या नातेवाईकांनी नुकताच केला आहे; या घटनेला जबाबदार असणाऱ्या संबंधित डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई व्हावी या मागणीसाठी बीटीया फाउंडेशन आणि झाशीची राणी प्रतिष्ठानच्या वतीनं आज बीजे वैद्यकीय महाविद्यालयाचे अधीक्षक विनायक काळे यांना निवेदन देण्यात आलं.

**<u>बंट्स समाज मेळावा</u>**

हॉटेल व्यवसायाच्या निमित्तानं भारताच्या दक्षिण भागातून बंट्स समाजाबांधव ज्यांना आपण आण्णा म्हणून ओळखतो ते पुण्या मुंबईत स्थिरावले आणि इथल्या खाद्य संस्कृती बरोबरच शहराच्या संस्कृतीशीही एकरूप झाले.त्यांच्या समस्या सोडविण्याचा आपण प्रामाणिक प्रयत्न केला, अशा भावना भाजप महायुतीचे पुण्यातील उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केल्या. बंट्स संघ पुणेनं आयोजित केलेल्या समाजाच्या मेळाव्यात ते आज बोलत होते.

**<u>नवमतदार</u>**

निगडीतल्या इन्स्टिट्यूट ऑफ चार्टड अकाउंटंट ऑफ इंडियाच्या पिंपरी चिंचवड शाखेच्या वतीनं आज मतदान जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

शहरातील सनदी लेखापाल, नवमतदार आणि नागरिकांनी लोकसभा निवडणुकीत मतदान करावं असं आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांनी केलं.

**<u>वाहन परवाना</u>**

पिंपरी चिंचवड शहरातून वाहणाऱ्या पवना, मुळा आणि इंद्रायणी नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर राडारोडा टाकल्यानं नद्या प्रदूषित होत आहेत. यावर उपाय योजना म्हणून अशा वाहनांचा परवाना रद्द करण्यात येणार असून त्या वाहन चालकांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल असा इशारा पालिकेच्या पर्यावरण विभागानं दिला आहे.या विरोधात पर्यावरण विभाग सातत्यानं कारवाई करत असल्याची माहिती पर्यावरण विभागाचे शहर सहअभियंता संजय कुलकर्णी यांनी दिली.

**<u>निधन</u>**

पुण्यातील वडगाव शेरी इथल्या भाजपच्या माजी नगरसेविका शितल शिंदे यांचं काल रात्री निधन झालं. त्या 42 वर्षांच्या होत्या.

**<u>निधन</u>**

प्रसिद्ध गायक पंडित शौनक अभिषेकी यांच्या मातोश्री विद्या जितेंद्र अभिषेकी यांचं पुण्यामध्ये वृद्धापकाळानं आज निधन झालं. त्या ८३ वर्षांच्या होत्या. पंडित जितेंद्र अभिषेकी बुवांच्या संगीतकार्याला त्यांनी आपलं आयुष्य समर्पित केलं होतं.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज दिवसभर आकाश निरभ्र होतं कमाल तापमान ३९ अंश आणि किमान तापमान १९ पूर्णांक ४ अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. उद्या कमाल तापमानात आणखी वाढ संभवत असून दुपारनंतर आकाश ढगाळ राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**